झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स -II, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-२/झोनिआ/ ४८५ /२०२३
दिनांक : ०७/०६ /२०२३.

५३९

## झोपडपट्टी निर्मुलन आदेश (पुर्वसूचना)

## महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ड अन्वये पुर्वसूचना .

प्रस्तावना -

(१) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख **यापुढे उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे;

(२) या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

(३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद गाव मौजे आकुर्डी, स.नं.८८पैकी, अजंठानगर झोपडपट्टी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टीचे क्षेत्रफळ १०९२२.९७ चौ.मी. या क्षेत्रावर (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. आर.के.डेव्हलपर्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला असून सदर प्रस्तावास झो.पु.प्रा., पुणे कडील नियमावली, २०१४ यातील नियम क्र. ४(५) च्या तरतूदीनुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आले बाबत प्र.सहायक संचालक नगररचना यांनी दि.०४/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सक्षम विभाग क्र.३, झो.पु.प्रा., पुणे यांना कळविले आहे;

(४) सदर क्षेत्रातील झोपडपट्टीचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट २) तयार करण्यात आली असून उक्त परिशिष्ट -२ नुसार सदर मिळकतीवर एकूण ४५२ झोपडया असून त्यापैकी निवासी पात्र २६६, अपात्र १३१ व बिगर निवासी पात्र २०, अपात्र २० आणि संयुक्त पैकी संयुक्त पात्र ०, संयुक्त पैकी निवास पात्र ३, संयुक्त पैकी बिगरनिवासी अपात्र ५ या प्रमाणे एकुण २८९ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत;

(५) सदर मिळकतीकरीता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश दि.०५/०७/२०२२ रोजी पारित करणेत आला आहे. सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक - पुणे विभागीय पुरवणी, जुलै १४-२०, २०२२ पृष्ठ मध्ये क्र. ४९-५० प्रसिध्द करणेत आला आहे. तसेच सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.१५/०७/२०२२ रोजी डकविण्यात आलेला आहे. तसेच दि.२१/०४/२०२३ रोजीचे क्षेत्रफळ दुरुस्तीबाबतचे शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक - पुणे विभागीय पुरवणी, मे ४-१०, २०२३ पृष्ठ मध्ये क्र. ३३ मध्ये आणि विश्वेश्वर या स्थानिक वर्तमानपत्रात दि.२४/०४/२०२३ रोजी प्रसिध्द करणेत आले आहे.

(६) उक्त झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र अंतिम आदेशास मा. शिखर तक्रार निवारण समिती, मुंबई अथवा कोणत्याही न्यायालयाची स्थगिती नाही आणि म्हणून, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी या क्षेत्रातील सर्व इमारती / झोपडया पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३ड अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे;

(७) विकसक मे. आर.के.डेव्हलपर्स यांचेमार्फत उपरोक्त मिळकतीवर राहणा-या सर्व झोपडीधारकांची झोपडीधारकांची तात्पुरत्या स्वरुपात राहण्याची व्यवस्था त्यांच्या जबाबदारीवर स.नं.६५ हि.नं.१ व २, आकुर्डी, निगडी या भूखंडावर उभारणेत आलेल्या संक्रमण शिबीरामध्ये (Transit Camp) करणार असलेबाबत रु.१००/- च्या मुंद्रकावरील हमीपत्र या कार्यालयाकडे सादर केले आहे.

उपरोक्त पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.

आदेश :-

(१) मी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३ड मधील तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे.